# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे

व

*खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

*मराठी विभाग आयोजित*

## 'लोकनेते शरद पवार जीवन व कार्य'

## या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र अहवाल

## दि. ६.२.२०१६

---

मराठी विभागाच्या वतीने आयोजित चर्चासत्रात बीजभाषण करताना रयत शिक्षण संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य आणि शरद पवार यांच्या भगिनी मीना जगधने यांनी सत्ता हे सेवेचे माध्यम मानताना सामान्य माणसाला केंद्रस्थानी मानून राजकारण करणाऱ्या शरद पवारांनी महाराष्ट्र आणि देशाच्या जडणघडणीत अलौकिक योगदान दिले असून त्यांचे जीवन व कार्य समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी दीपस्तंभासारखे आहे असे गौरवोद्गार काढले. त्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग आणि महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्येमाने आयोजित 'लोकनेते शरद पवार जीवन व कार्य' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्रात बीजभाषण करताना बोलत होत्या. या वेळी बोलताना मीना जगधने यांनी शरद पवार यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलगडून दाखविले. शरद पवारांच्या कर्तृत्वामागे आई वडिलांनी केलेले संस्कार कारणीभूत आहेत असे सांगून आई शारदाबाई आणि वडील गोविंदराव हे शिक्षणाबद्दल कळवळा असलेले पुरोगामी विचारांचे व समाजभान असलेले दांपत्य होते. त्यांनी केलेल्या संस्कारांचा परिणाम आम्हा सर्व भावंडांवर झाल्याचे त्या म्हणाल्या. हुशारी, धाडस, प्रसंगावधान, स्मरणशक्ती हे गुण शरदरावांनी आमच्या आईकडून घेतल्याचे त्या म्हणाल्या . सूक्ष्म निरीक्षणदृष्टी, नाविन्याचा शोध घेण्याची वृत्ती, भविष्याचे नेमके सूचन करणारा, प्रचंड परिश्रम करणारा, सकारात्मक असलेला, आपल्यावर होणाऱ्या टीकेने विचलित न होता त्यावर कधीही प्रतिक्रिया न देणारा आणि व्यवस्थापन कौशल्यात माहीर असलेल्या शरदरावांचे पैलू त्यांनी विविध प्रसंगातून उलगडून दाखविले.
महिला सबलीकरण, विद्यापीठ नामविस्तार, फलोत्पादन, औद्योगिकीकरण, विज्ञान व माहिती तंत्रज्ञान, साहित्य, संगीत, क्रीडा, शेती, उद्योजक या सर्व विषयात रुची आणि गती असणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणजे शरद पवार हे एकमेव नाव सध्याच्या राजकारणात आपल्याला पाहायला मिळते. त्यांच्याइतकी राजकीय समज, उंची आणि ज्ञान असलेला नेता सद्या अपवादानेच पाहायला मिळेल. शरदरावांनी आजारपण, संकट कधी कुरवाळत न बसता प्रचंड

इच्छाशक्तीने व सकारात्मक वृत्तीने त्यावर मात केल्याचे सांगून त्यापासून नव्या पिढीने प्रेरणा घेण्याची गरज व्यक्त केली. आम्हा कुटुंबाचा अभिमान असलेल्या शरदरांवांनी देशाच्या राजकारणात स्वतःचे भक्कम स्थान निर्माण केल्याचे सांगून १० डिसेंबरला दिल्लीला झालेला सर्वपक्षीय कार्यक्रम त्याची पावती असल्याचे त्या म्हणाल्या.

या वेळी मा. प्र.कुलगुरू अशोक भोईटे यांनी यशवंतरावांचा सामाजिक विचारांचा वारसा शरद पवारांनी आयुष्यभर जपला, जोपासला असून यशवंतरावांनी महाराष्ट्राला शरदरावांच्या रुपाने विकासाची देणगी दिल्याचे सांगितले. अवर्षणग्रस्थ बारामतीला विकासाचे आदर्श मॉडेल बनवून देशाच्या नकाशावर नेण्याचे काम शरदरावांनी केल्याचे त्यांनी सांगितले.

चर्चासत्राच्या समारोप प्रसंगी बोलताना अड राम कांडगे यांनी शरद पवारांनी नावविचारांची परंपरा जोपासणाऱ्या महाराष्ट्राला पुढे नेण्याचे काम केले असे सांगून कृतीवादी व्हा हा शरदरावांच्या जीवनातील महामंत्र आपण सर्वांनी समजून घ्यायला हवा असे आवाहन केले. तासगावचे डी. ए. माने यांनी संसदीय लोकशाही परिपक्व करण्यात शरद पवार यांचा मोठा वाटा असून यशवंतरावांनंतर तेवढेच तोलामोलाचे कार्य त्यांनी केल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अड देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे माजी प्रकुलगुरू डॉ अशोक भोईटे, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव अड राम कांडगे, मा. डी. ए. माने, प्राचार्य डॉ एस बी पाटील, प्राचार्य डॉ मंजुश्री बोबडे, प्राचार्य डॉ भास्कर शेळके, डॉ स्नेहल तावरे, डॉ अविनाश आवलगावकर, उपप्राचार्य प्रा. जी.बी. शिंदे, विद्यापीठ प्रतिनिधी आकाश नवरे आणि विविध महाविद्यालयातून आलेले प्राद्यापक, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या चर्चासत्रात सुमारे १७७ संशोधक प्राध्यापक व विद्यार्थी अभ्यासक यांनी सहभाग घेतला.

चर्चासत्राचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस बी पाटील यांनी, सूत्रसंचालन चर्चसत्राचे सहसमन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार मराठी विभाग प्रमुख व समन्वयक डॉ बी डी अनुसे यांनी मानले.

डॉ बी डी अनुसे
मराठी विभाग प्रमुख



चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी सौ. मीनाताई जगधने यांचे स्वागत करताना
संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील



चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी बीजभाषण करताना
सौ. मीनाताई जगधने



चर्चासत्रात सहभागी झालेले
प्राध्यापक व विद्यार्थी



सकाळ

१०

# देशाच्या जडणघडणीत पवार यांचे योगदान

## मीना जगधने यांचे गौरवोद्‌गार; राजगुरुनगरला राज्यस्तरीय चर्चासत्र

राजगुरुनगर, ता. ६ : "सत्ता हे सेवेचे माध्यम मानताना सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून राजकारण करणाऱ्या शरद पवारांनी महाराष्ट्र आणि देशाच्या जडणघडणीत अलौकिक योगदान दिले. त्यांचे जीवन व कार्य समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी दीपस्तंभासारखे आहे," असे गौरवोद्‌गार रयत शिक्षण संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य आणि शरद पवार यांच्या भगिनी मीना जगधने यांनी काढले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने 'लोकनेते शरद पवार : जीवन व कार्य' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजित केले होते. त्यात बीजभाषण करताना त्या बोलत होत्या.

राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात लोकनेते शरद पवार यांच्या जीवनकार्यावर आयोजित चर्चासत्रात बोलताना पवार यांच्या भगिनी मीना जगधने.

अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या वेळी शिवाजी विद्यापीठाचे माजी प्रभारी कुलगुरू डॉ. अशोक भोईटे, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, अॅड. राम कांडगे, डी. ए. माने, प्राचार्य डॉ. मंजुश्री बोबडे, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, डॉ. स्नेहल तावरे, डॉ. अविनाश आवलगावकर, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे, आकाश नवले आणि विविध महाविद्यालयांतून आलेले प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

जगधने म्हणाल्या, "शरद पवारांच्या कर्तृत्वामागे आई शारदाबाई आणि वडील गोविंदराव पवार यांनी केलेले संस्कार कारणीभूत आहेत. शिक्षणाबद्दल कळकळ असलेले पुरोगामी विचारांचे व समाजभान असलेले आमचे आई-वडील होते. त्यांच्या संस्कारांचा परिणाम आम्हा सर्व भावंडांवर झाला. हुशारी, धाडस, प्रशासन, स्मरणशक्ती हे गुण शरदरावांनी आईकडून घेतले."

"विज्ञान तंत्रज्ञान, साहित्य, संगीत, क्रीडा, शेती, उद्योजक या सर्व विषयांत रस आणि गती असणारे शरद पवार हे एकमेव नेते महाराष्ट्राच्या राजकारणात पाहायला मिळतात. त्यांच्याइतकी राजकीय समज, उंची आणि ज्ञान असलेला नेता सध्या अपवादानेच सापडेल," असे त्या म्हणाल्या. भोईटे म्हणाले, "यशवंतरावांनी महाराष्ट्राला शरदरावांच्या रूपाने विकासाची देणगी दिली आहे."

या वेळी तावरे, डी. ए. माने यांचेही भाषण झाले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. सहसमन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. मराठी विभाग प्रमुख व समन्वयक डॉ. बी. डी. अनुसे यांनी आभार मानले.

वर्तमानपत्रातील प्रसिद्धी